संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# सार्वजनिक जागा आणि सार्वजनिक उत्सव

अनेकवेळा न्यायालयाच्या अनेक निकालांचा योग्य अर्थ न कळल्यामुळे समाजात आणि सरकारी यंत्रणाचा गोंधळ उडत असतो. आतादेखील मुंबईतील सार्वजनिक जागेवर मंडप उभारण्याबाबत किंवा उत्सवांसाठी सार्वजनिक जागा वापरण्याबाबत न्यायालयाने निर्बंध घातल्याची चर्चा सुरू आहे. प्रामुख्याने गणेशोत्सवाच्या तोंडावर न्यायालयाचा हा आदेश आल्याने बराच गोंधळ उडालेला दिसतो. कारण या आदेशाची अंमलबजावणी झाली तर मुंबईतल्या हजारो गणेशोत्सव मंडळाच्या उत्साहावर आणि उत्सवावरही पाणी पडणार आहे. न्यायालयाचा मूळ आदेश नीट समजावून घ्यावा लागणार आहे. न्यायालयाने सार्वजनिक जागा असा शब्द प्रयोग करतांना त्यात कोणकोणत्या प्रकारच्या सार्वजनिक जागा याचा खुलासा होण्याची गरज आहे. मोकळी मैदाने जाचा वापर सार्वजनिक कारणांसाठी होतो किंवा मुंबईतले रस्ते, पथ यांचा वापर सार्वजनिकरित्या केला जातो. अशा जागांचा जर उत्सवांसाठी वापर करायचा नसेल तर मग गणेशोत्सवासारखे सार्वजनिक उत्सव कोणत्या ठिकाणी भरवावेत किंवा घ्यावेत असा प्रश्न निर्माण होतो. उत्सवांचे स्वरूप सर्वाजनिक असेल तर असे उत्सव सार्वजनिक जागांवर घेण्याशिवाय पर्याय उरत नाही. मुळात मुंबईत जागांची तीव्र टंचाई आहे. सार्वजनिक उत्सवांना मिळणारा प्रचंड प्रतिसाद पाहाता मोठी आणि मोकळी जागा आवश्यक ठरते. कोणत्याही सार्वजनिक उत्सवाला होणारी गर्दी जर योग्य पध्दतीने नियंत्रित करायची असेल शक्य तितकी मोकळी जागा असलेली केव्हाही चांगली ठरेल. आता नेमक्या गणेशोत्सवाच्या तोंडावर हा आदेश आल्याने या विषयावर उलटसुलट चर्चा सुरू राहील. मुंबईतल्या सार्वजनिक गणेशोत्सव समितीने याबाबत प्रारंभापासून सरकारकडे अर्ज विनंत्या केल्या होत्या. न्यायालयाचा असा आदेश येण्यापूर्वी सरकार किंवा महापालिकेने योग्य ती भूमिका घेणे गरजेचे होते. परंतु नेहमीच्या पध्दतीप्रमाणे शासकीय दिरंगाई केली गेली. न्यायालयात योग्य ती बाजू मांडली गेलेली दिसत नाही. आता या आदेशांमुळे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी त्यांच्या नेहमीच्या जागांवर मंडप टाकायचा किंवा नाही असा संभ्रम निर्माण झाला आहे. गणेशोत्सवाची तयारी किमान दोन महिने आधी सुरू होते. म्हणूनच याबाबत आता सरकारकडून योग्य तो खुलासा होण्याची गरज आहे. मुंबईतल्या गणेशोत्सवाप्रमाणे याच काळात इतर धर्मियांचेही सण येतात. त्यांचे स्वरूप गणेशोत्सवासारखे मोठे नसले तरी त्यातही अनेक ठिकाणी सार्वजनिक जागांचा वापर केला जातो. असा परिस्थितीत सार्वजनिक जागांचा वापर या उत्सवांसाठी न करता सर्वसामान्य माणसासाठी त्या जागा सतत मोकळ्या राहिल्या पाहिजेत, असाच अर्थ त्यातून ध्वनित होतो. म्हणूनच भविष्यकाळात मुंबईतल्या सार्वजनिक जागांचा वापर हा मुद्या अधिक महत्त्वाचा ठरणार आहे.

### भाजपाची झाकपाक

आता यासंदर्भात भारतीय जनता पार्टीच्या मुंबई शाखेने न्यायालयात याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. खरे तर ज्या पक्षाचे सरकार आहे. त्या पक्षाच्या नेत्यांनी याबाबत यापूर्वीच जागरुकता दाखवायला हवी होती. गेल्याच आठवड्यात न्यायालयाने याबाबत सरकारला योग्य ती भूमिका मांडण्याची मुदत दिली होती. एवढेच नव्हे तर सार्वजनिक उत्सवांमध्ये वापरला जाणाऱ्या डीजेबाबतही कडक भूमिका घेतली होती. त्यामागचा उद्देश अतिशय स्पष्ट स्वरूपाचा आहे. सामान्य माणसाला कोणत्याही परिस्थितीत त्रास होऊ नये. उत्सवकाळात त्या-त्या भागात लाऊड स्पीकर्सच्या आवाजामुळे मोठ्या प्रमाणावर ध्वनीप्रदूषण होते. शिवाय या भागातील नवजात शिशुंपासून ते वृध्दमंडळींना किंवा रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागतो. तो थांबविण्याच्या उद्देशाने न्यायालयाने अशाप्रकारे कर्णकर्कश ध्वनिक्षेपकांच्या वापरावरही निर्बंध आणण्याचे सूतोनाच केले होते. त्याचवेळी न्यायालय आपल्या अंतिम निकालात सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या सार्वजनिक उत्सवांबाबत काही निर्बंध घालण्याची शक्यता व्यक्त झाली होती. तेव्हाच जर राज्य शासनाने दक्षता घेऊन आपले म्हणणे नीट मांडले असते तर आज ही वेळ आली नसती किंवा मुंबई भाजपाला त्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करण्याची गजरही पडली नसती. आता त्यांच्याच पक्षाच्या सरकारने काहीच हालचाल केली नाही. नेहमीप्रमाणे सरकारी दिरंगाईचे प्रदर्शन केले आणि आता आपल्या नाकर्तेपणाची बाजू सावरण्यासाठी न्यायालयात धाव घेण्याचे नाटक भाजपाला करावे लागत आहे.

### न्यायालयाचा संदेश

उद्या सगळ्या संदर्भात एक महत्त्वाचा मुद्दा सर्वांनाच लक्षात द्यावा लागणार आहे आणि त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढावा लागणार आहे. विशेषतः मुंबईसंदर्भात हा मुद्दा जास्त महत्त्वाचा ठरतो. जागेची तीव्र टंचाई असलेल्या मुंबईतल्या सार्वजनिक जागांचा वापर सरकारला निश्चित स्वरूपाचे धोरण ठरविण्याची गरज निर्माण झाली आहे. सर्वसामान्य माणसाच्या दैनंदिन उपयोगात किंवा वापरात असणाऱ्या जागांना सर्वसाधारणपणे सार्वजनिक जागा म्हटले जाते त्यात खेळाची मैदाने रस्त्यावरचे चौक किंवा काही ठिकाणचे मोक्याचे रस्ते यांचा समावेश होतो. आजच्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे स्वरूप पाहिले तर मुंबईचे काम परंतु राज्यभरात ठिकठिकाणच्या रस्त्यांवरचे चौक, काही मैदाने, थोड्याफार प्रमाणावर पदपथांचा वापर केला जातो. कारण दुसऱ्या जागाच उपलब्ध नसतात. खाजगी जागांवर किती हॉल अथवा सभागृहांमध्ये गणेशोत्सव घेणे कोणत्याच सार्वजनिक उत्सव मंडळाला परवडू शकत नाही हे उत्सव वर्गणी गोळा करून साजरे होतात. जाहिराती देणाऱ्यांच्या माध्यमातून त्याचा सार्वजनिक मंडळाला काही प्रमाणात आर्थिक उत्पन्न होते, परंतु त्या पैशाचा वापरही अनेक मंडळे पुन्हा सार्वजनिक किंवा सामाजिक कामांसाठी करीत असतात. म्हणजे त्यांच्या दृष्टिकोनातून विचार केला तर हा सार्वजनिक शब्द तसा खूप महत्त्वाचा ठरतो. समाजाच्या सहभागातून समाजाच्या हितासाठी या उत्सवांचा बऱ्यापैकी उपयोग होतो ही भूमिका नीट मांडली गेली तर अतिशय थोड्या काळासाठी होणारे हे सार्वजनिक उत्सव अधिक नीट पध्दतीने साजरे होऊ शकतात. न्यायालयाच्या या निर्णयाचा किंवा निर्देशाचा अर्थ नीट लक्षात घेऊन सार्वजनिक जागेचा वापर हा अधिक चांगल्या पध्दतीने झाला पाहिजे, हाच संदेश दिला गेला आहे. त्यातून सार्वजनिक उत्सवांचे स्वरूप उत्तम असेल तर त्याच सार्वजनिक जागेचा वापर सार्वजनिक कामासाठी झाल्याचे आपल्याला म्हणता येऊ शकते. दुदैवाने आज सार्वजनिक उत्सवांचे स्वरुप थोडे बदलत चालले आहे. उत्सवातले पावित्र्य किंवा मांगल्य हरवते आहे. त्याला व्यावसायिकतेचे स्वरूप येत आहे. उत्सवांचे का पारीकरण होऊ लागले आहे. या गोष्टींचा विचार झाला पाहिजे. मात्र मुंबईसारख्या दाटीवाटीच्या शहरात सार्वजनिक उत्सव हा सार्वजनिक जागांवर घेणे हा एकमेव पर्याय शिल्लक राहतो. आम्हाला न्यायालयाच्या या ताज्या निर्देशातून उत्सवांचे स्वरूप सुधारण्याचाच संदेश दिला गेला असल्याचे जाणवते.